संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४९७/२०२४

| | |
|---|---|
| MHAH210008772024 | **निशाणी ०१ खालील आदेश**<br>**(सरकार वि. अशोक होले व इतर ७)** |

**उमा ए. भोसले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जामखेड,**
**ता.जामखेड, जि. अहमदनगर यांच्या समोर**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | – | १०.०२.२०२४ |
| २. | फिर्याद अथवा अहवाल दिल्याची तारीख | – | १०.०२.२०२४ |
| ३. | फिर्यादीचे नाव | – | महाराष्ट्र शासन तर्फ<br>जामखेड पोलीस स्टेशन,<br>ता. जामखेड,<br>जि. अहमदनगर. |
| ४. | आरोपीचे नाव | १.<br><br><br><br>२.<br><br><br>४.<br><br><br><br>५.<br><br><br><br>७. | **अशोक दिलीप होले**<br>वय – २८ वर्ष,<br>व्यवसाय – शेती,<br>रा. आरोळेवस्ती, जामखेड<br>**सुरेश दत्तात्रय राऊत**<br>वय – ३१ वर्ष,<br>व्यवसाय – शेती,<br>**चंद्रकांत दत्तात्रय राऊत**<br>वय – ३३ वर्ष,<br>व्यवसाय – शेती<br>आ.क्र. २ व ४ एवन कॉर्नर<br>**श्रीरंग लक्ष्मण माने**<br>वय – २६ वर्ष,<br>व्यवसाय – शेती<br>रा. आरोळेवस्ती, जामखेड<br>**पवन ऊर्फ स्मितल अनिल कदम** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वय – ३१ वर्ष,<br>व्यवसाय – शेती<br>रा. आरोळेवस्ती,<br>ता. जामखेड, जि. अ.नगर. |
| ५. | फिर्यादीमधील गुन्ह्याचे स्वरुप :– | | |

तुम्ही आरोपी दिनांक १०.०२.२०२४ रोजी १५.३० वाजता मौजे जामखेड, ता. जामखेड, जि. अहमदनगर येथील जामखेड ते करमाळा जाणारे रोडलगत गुगळे लॅबचे अलीकडे एका कापडी शेडच्या आडोशाला तीरट नावाचा हारजितीचा जुगार खेळताना व खेळविताना मिळून आलात आणि त्याद्वारे तुम्ही माझ्या अधिकारक्षेत्रात **महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२(अ)** नुसार गुन्हा केला असे. आरोपींनी गुन्हा मान्य केला आहे.

१. ............................

२. ...........................

४. ...........................

५. ...........................

७. ...........................

आरोपींची सही/अंगठा

समक्ष,

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.03.14 15:05:35 +0530

**( उमा ए. भोसले )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
**<u>जामखेड</u>**

दिनांक– १४/०३/२०२६
ठिकाण – जामखेड.

## <u>न्यायनिर्णय</u>

आरोपी माझेसमोर हजर झाले. आरोपी क्रमांक १, २, ४, ५ व ७ यांनी त्यांना सदरचा गुन्हा मान्य असल्याची कबुली पुरसिस (निशाणी ०४) दाखल केली आहे. मी आरोपींना गुन्ह्याच्या कबुलीबाबत विचारले असता त्यांनी स्वेच्छेने कबुली दिली असल्याने सांगितले. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | आरोपी क्रमांक **१. अशोक दिलीप होले, २. सुरेश दत्तात्रय राऊत, ४. चंद्रकांत दत्तात्रय राऊत, ५. श्रीरंग लक्ष्मण माने व ७. पवन ऊर्फ स्मितल अनिल कदम** यांना महाराष्ट्र जुगारबंदी कायदा कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा केलेच्या आरोपाकरिता दोषी ठरविण्यात येते. |
| २. | आरोपीं क्रमांक १, २, ४, ५ व ७ यांना कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व रक्कम रुपये ३००/- प्रत्येकी (अक्षरी रक्कम रुपये तिनशे मात्र प्रत्येकी) द्रव्यदंडांची शिक्षा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये देण्यात येते. |
| ३. | आरोपींनी दंडाची रक्कम न भरल्यास त्यांना प्रत्येकी ३ (तीन) दिवसांची साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते. |
| ४. | जप्त मुद्देमाल जुगार खेळण्याचे साहित्य मुल्यहीन असल्याने त्यांचा अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा तसेच जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये १०,०२०/- अपिल कालावधीनंतर सरकारजमा करण्यात यावी. |
| ५. | सदरचे प्रकरण दिनांक ०४.०७.२०२४ रोजी दाखल झालेले असुन आरोपी क्रमांक ३, ६ व ८ यांना समन्स काढुन देखील ते हजर झालेले नाहीत. त्यामुळे सदरचे प्रकरण प्रलंबीत ठेवून कुठलाही उद्देश साध्य होणार नाही. सबब, आरोपी क्रमांक ३, ६ व ८ यांचेविरुध्द प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५८ अन्वये निकाली काढण्यात येते. |

Digitally signed by UMA KAKASAHEB GANGANE
Date: 2026.03.14 15:05:42 +0530

**( उमा ए. भोसले )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
**जामखेड**

दिनांक- १४/०३/२०२६
ठिकाण - जामखेड.